**कल्याण डोंबिवली महानगरपालिका**

**नगररचना विभाग**

सुधारीत बांधकाम परवानगी क्र. KDMC/TPD/BP/27Village/2021-22/01/338. Dt 20/12/2022.

संदर्भ १) No.KDMC/NRV/BP/27Villages/2021-22/01/219, Dt. 29/07/2021 रोजीची सुधारीत बांधकाम परवानगी.

२) वास्तुशिल्पकार श्री विजय पाडे यांचा दि १२/०४/२०२२ रोजीचा सुधारीत बांधकाम परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ तसेच म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ४५ नुसार स.नं. ३६, हि.नं. २३/३ व २४, मौजे आडीवली ढोकळी, कल्याण (पूर्व) मध्ये ७/१२ उताऱ्यानुसार २९४००.०० चौ.मी क्षेत्रापैकी किमान हद्दीनुसार प्राप्त होणाऱ्या २८७७० ९० चौ.मी क्षेत्राच्या भूखंडावर UDCPR नुसार Basic FSI, Premium FSI व Ancellary FSI चा विचार करुन तसेच UDCPR नुसार समावेशक आरक्षणांतर्गत आरक्षण क्र. ११ 'माध्यमिक शाळा' या आरक्षणाचे क्षेत्र व २४ ०० मी. रुंद रस्त्याने बाधीत क्षेत्र विकास हक्क स्वरुपात विचारात घेऊन तसेच मा. आयुक्त महोदय यांनी मंजूर केलेले १०६३६.०० चौ.मी. क्षेत्र वापरुन एकूण ९९१८३ १८ चौ.मी बांधकाम क्षेत्रास सुधारीत बांधकाम परवानगी प्रदान करण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत नव्याने केलेल्या सर्व्हेक्षण अहवालानुसार ७/१२ उताऱ्यानुसार २९४००.००चौ.मी. क्षेत्राच्या भूखंडापैकी किमान हद्दीनुसार प्राप्त होणाऱ्या २९२४२.७५ चौ.मी क्षेत्राच्या भूखंडावर UDCPR नुसार Basic FSI, Premium FSI व Ancellary FSI चा विचार करुन तसेच UDCPR नुसार समावेशक आरक्षणांतर्गत आरक्षण क्र. ११ 'माध्यमिक शाळा' या आरक्षणाचे क्षेत्र ४०:५०च्या प्रमाणात विचारात घेऊन व २४.०० मी. रुंद रस्त्याने बाधीत क्षेत्र विकास हक्क स्वरुपात विचारात घेऊन तसेच मा आयुक्त महोदय यांनी यापूर्वी मंजूर केलेले १०६३६.०० चौ.मी. क्षेत्र वापरुन एकूण १००२७४.२७ चौ.मी. बांधकाम क्षेत्राच्या भुखंडाचा विकास करावयास दिनांक १२/०४/२०२२ च्या अर्जास अनुसरुन खालील अटी व शर्तीस अधिन राहून, तसेच नकाशावर हिरव्या रंगाने दुरुस्ती दाखविल्याप्रमाणे वाढे–भिंतीच्या बांधकामासह, बांधकाम प्रमाणपत्र देण्यात येत आहे

<u>बांधकामाचा तपशील :–</u>

| प्लॉट | इमारत | मजले | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| प्लॉट 'ए' | इमारत क्र १ | स्टिल्ट (पै), तळ (पै) + सात मजले (रहिवास) | ९४७.३२ |
| प्लॉट 'बी' | इमारत क्र १ | स्टिल्ट (पै), तळ (पै) + पहिला मजला ते तेवीस मजले (रहिवास) | १३५१९ ६८ |
| | इमारत क्र. २ | स्टिल्ट (पै), तळ (पै) + पहिला मजला ते तेवीस मजले (रहिवास) | १४०५३.७४ |
| | इमारत क्र ३ | स्टिल्ट (पै), तळ (पै) + चौथा मजला ते बावीस मजले (रहिवास) | ११५१६.५२ |
| | | *पहिला मजला ते तिसरा मजला व तेवीसावा मजला (म्हाडाकरीता)* | |
| | इमारत क्र. ४ | स्टिल्ट (पै), तळ (पै) + तेवीस मजले (रहिवास +वाणिज्य) | १४३१५ १३ |
| | इमारत क्र. ५ | स्टिल्ट (पै), तळ (पै) + तेवीस मजले (रहिवास + वाणिज्य) | १४३०६ ४३ |
| | इमारत क्र. ६ | स्टिल्ट (पै), तळ (पै) + दुसरा मजला ते बावीस मजले (रहिवास) | १६३१८.८० |
| | | *पहिला मजला व तेवीसावा मजला (म्हाडाकरीता)* | |
| | इमारत क्र. ७ | स्टिल्ट (पै), तळ (पै) + पंधरा मजले (रहिवास) | १३८९२.४२ |